| MHMM260003912023 | | | |
|---|---|---|---|
| | प्राप्त दिनांक | : | ०८/०५/२०२३. |
| | नोंदणी दिनांक | : | ०८/०५/२०२३. |
| | निकाल दिनांक | : | १३/०३/२०२४. |
| | कालावधी | : | ००वर्षे, १० महिने, ०५ दिवस. |
| | **निशाणी** | : | **२५** |

# महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालयात
# ३६ वे न्यायालय, मुंबई सेंट्रल, मुंबई
# (न्यायनिर्णय कलम ३५५ फौ. प्र. सं. अन्वये)

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | खटला क्रमांक | :– | २८३/पीडब्ल्यू/२०२३. |
| | सी.एन.आर. क्रमांक | | एमएचएमएम२६०००३९१२०२३. |
| (ब) | अपराध घडल्याची तारीख | :– | ०७/१०/२०२२. |
| (क) | फिर्यादीचे नाव<br>(अभियोग पक्ष) | :– | महाराष्ट्र सरकार,<br>द्वारा – वरिष्ठ पोलीस निरिक्षक,<br>चर्चगेट लोहमार्ग पोलीस ठाणे.<br>(गुन्हा नोंद क्र.– २७७/२०२२). |
| (ड) | आरोपीचे नाव | :– | इजहर अताउल्ला रेहमान शेख उर्फ सलमान उर्फ खिडकी<br>वय :– २७ वर्षे.<br>काम धंदा :– मच्छी विक्री व्यवसाय.<br>रा.ठि.:– भायखळा, मुंबई. |
| (प) | कोणत्या स्वरूपाचा गुन्हा आहे ? | :– | भारतीय दंड विधान कलम ३७९, ७५ प्रमाणे. |
| (फ) | आरोपीला गुन्हा कबुल आहे का ? | :– | आरोपीला गुन्हा कबुल नाही. |
| (ब) | अंतिम आदेश | :– | आरोपीला गुन्ह्यातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| (भ) | आदेशाचा दिनांक | :– | १३/०३/२०२४. |

अभियोग पक्षातर्फे विशेष सरकारी विद्वान विधिज्ञ :– श्रीमती शेख नाजिया नुरूल अमीन.

आरोपी तर्फे विद्वान विधिज्ञ :– श्री. गोविंद शेट्टी

**न्यायनिर्णय** **दि.१३/०३/२०२४.**

प्रस्तूतचा खटला हा आरोपीच्या विरूध्द भारतीय दंड विधान कलम ३७९, ७५ अन्वये दाखल करण्यात आला व चालविण्यात आला आहे.

२. प्रस्तूतच्या खटल्यातील अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात असे आहे कि, फिर्यादी नामे सोनाली मोहनसिंग सोनार, राहणार नालासोपारा, पालघर हिने दि. ०७/१०/२०२२ रोजी, अशी फिर्याद दिली कि, दि. ०७/१०/२०२२ रोजी ती कामाकरीता नालासोपारा फलाट क्र. ०२ वरून १२.०७ वाजताची अप चर्चगेट फास्ट लोकलच्या चर्चगेट बाजुकडील चौथे महिलांचे डब्यात सिटवर बसून प्रवास करून चर्चगेट रेल्वे स्टेशन फलाट क्र. ०१ वर सुमारे १३.३३ वाजता आल्या व तिचे सामान घेणेसाठी हातातील मोबाईल फोन सिटवर ठेवला व चर्चगेट रेल्वे स्टेशन फलाट क्र. ०१ वर मोबाईल फोन न घेताच उतरली. त्यानंतर लगेचच मोबाईल फोन विसल्याचे लक्षात आल्याने ती नमुद डब्याकडे गेली परंतु सिटवर ठेवलेला मोबाईल फोन मिळून आला नाही.

३. फिर्यादीने दिलेल्या जबाबावरून चर्चगेट लोहमार्ग पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक– २७७/२०२२, भारतीय दंड विधान कलम ३७९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. अभिलेखावरील कागदपत्रांवरून असे दिसून येते की, त्यानंतर सदरचा गुन्हा तपासाकरीता पोलीस हवालदार श्री. जी. आर. क्षीरसागर, गुन्हेशाखा, युनिट ०६, वांद्रे लोहमार्ग यांच्याकडे देण्यात आला. त्यांनी सदर गुन्ह्याचा तपास करून आरोपीच्या विरूध्द या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

४. प्रस्तूत खटल्यामध्ये निशाणी क्र. ०२ कडे आरोपी विरूध्द भारतीय दंड विधान कलम ३७९, ७५ प्रमाणे गुन्हा केल्याच्या आरोपावरून दोषारोप निश्चित करून आरोपीला त्याच्यावर ठेवलेले

आरोप वाचुन दाखविले असता व समजावून सांगितले असता त्याने ते नाकारले आहे व कामकाज पुढे चालू ठेवण्याची विनंती केली आहे.

५. आरोपी विरूध्दचे सदरचे आरोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे एकूण पाच साक्षीदार तपासण्यात आले. निशाणी क्रमांक ०१ वरील दिंनाक २३.०१.२०२४ रोजीच्या आदेशान्वये अभियोग पक्षाचा साक्षपुरावा बंद करण्यात आला. आरोपी विरूध्द आलेला आक्षेपार्ह पुरावा फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३अन्वये (नि.क्र.—२४) आरोपीला वाचून दाखविण्यात आला. आरोपीने त्याचे जबाबात संपूर्ण नकारात्मक बचाव घेतलेला असून त्याचे विरूध्द चुकीची फिर्याद दाखल करण्यात आली असल्याचे सांगितले. आरोपीने स्वतःच्या बचावार्थ स्वतःला अथवा इतर कोणत्याही साक्षीदाराला तपासले नाही. तसेच कोणताही कागदोपत्री पुरावा देखील दाखल केलेला नाही.

६. प्रस्तुत खटल्याच्या कामी दोन्ही पक्षांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला असता व या खटल्यातील रेकॉर्डवरील पुरावा पहाता प्रस्तुत खटल्याच्या निकालाकरीता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होत असुन त्यांचे निष्कर्ष खालील कारणमिमांसेसह नोंदविलेले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे शाबीत केले का, कि दि. ०७/१०/२०२२ रोजी, सुमारे १३.३३ वाजताच्या दरम्यान, चर्चगेट रेल्वे स्टेशन फलाट क्र. ०१ वर, आरोपीने हेतूपुर्वक, स्वेच्छेने, फिर्यादीच्या मोबाईल फोनची चोरी केली आणि त्या अनुषंगाने भारतीय दंड | |

संहितेच्या कलम ३७९ नुसारचा गुन्हा केला आहे? ... नकारार्थी

२. अभियोग पक्षाने असे शाबीत केले का, कि आरोपीला चोरीच्या गुन्ह्यामध्ये अगोदर दोषी ठरविलेले होते आणि त्या अनुषंगाने भारतीय दंड संहितेच्या कलम ७५ नुसारचा गुन्हा केला आहे? ... नकारार्थी

३. आदेश काय? ... अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारणमिमांसा

७. प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपी विरूध्दचे आरोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे एकूण पाच साक्षीदार तपासले. ते खालीलप्रमाणे :—

| अनुक्रमांक | साक्षीदारांचे नांव | साक्षीदार क्रमाक | साक्षीदारांची स्थिती | निशाणी क्रमाक |
|---|---|---|---|---|
| १. | सोनाली मोहनसिंग सोनार | साक्षीदार.क्र.१ | फिर्यादी | निशाणी.क्र ०५ |
| २. | यासीन मोहम्मद पठाण | साक्षीदार.क्र.२ | पंच साक्षीदार | निशाणी.क्र ११ |
| ३. | कृष्णराव सहदेव चव्हाण | साक्षीदार.क्र.३ | पोलिस साक्षीदार | निशाणी.क्र १५ |
| ४. | मयुर अंकुश भैय्ये | साक्षीदार.क्र.४ | पोलिस साक्षीदार | निशाणी.क्र १८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | गणेश रामनाथ क्षिरसागर | साक्षीदार.क्र.५ | तपासिक अंमलदार | निशाणी.क्र २० |

तसेच फिर्याद (नि.क्र.०६), एफ.आय.आर. (नि.क्र.०७), फिर्यादीचे मोबाईल फोनबाबतचे बंधपत्र (नि.क्र.०८), निवेदन पंचनामा (नि.क्र.१२), पंचनामा (नि.क्र.१३), आरोपी अटकेचा रिपोर्ट (नि.क्र.१९), मुददेमाल पावती (नि.क्र.२१), वस्तु ओळख परेड पंचनामा (नि.क्र.२२), मुददेमाल हस्तगत व गुन्हे उघड केलेबाबतचा रिपोर्ट (नि.क्र. २३) हे दस्तऐवज सिध्द केलेले आहेत.

## मुद्दा क्र. १ व २ बाबत :—

८. भा.द.वि कलम ३७९ अंतर्गत आरोपी विरूध्दचे आरोप सिध्द करण्याकरीता आभियोग पक्षाने खालील बाबी सिध्द करणे गरजेचे ठरते.

*Section 379 :- Essential Ingredients*

*(i) Dishonest intention to take property;*

*(ii) The property must be movable;*

*(iii) It should be taken out of the possession of another person;*

*(iv) It should be taken without the consent of that person; and*

*(v) There must be some moving of the property in order to accomplish the taking of it.*

९. त्याअनुषंगाने आभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन करणे गरजेचे ठरते. फिर्यादीने न्यायालयासमक्ष साक्षीपुरावा देताना असे कथन केले आहे की, दिनांक ०७.१०.२०२२ रोजी ती तिच्या मोठया बहिणीसोबत चर्चगेटला आली

होती. त्यासाठी त्यांनी नालासोपारावरून १२.०० वाजताची चर्चगेट लोकल ट्रेन पकडली होती. त्यानंतर सदरची ट्रेन चर्चगेट रेल्वे स्टेशनला दुपारी ०१.०० वाजता पोहचली. त्यांना चर्चगेटला उतरायचे असल्याने ती तिची रॅकवर ठेवलेली बॅग काढण्यासाठी उठली, त्यावेळी तिचा मोबाईल फोन सिटवर ठेवलेला होता. ती तिची बॅग घेवून उतरत असतांना ती तिचा मोबाईल फोन विसरल्याचे लक्षात आले. त्यानंतर तिने परत येवून तिचा मोबाईल फोन पाहिला असता तिने सिटवर ठेवलेला मोबाईल फोन मिळून आला नाही. ती पुढे असे सांगते की, तिला असे समजले की, तिचा मोबाईल फोन एका अज्ञात महिलेने चोरलेला आहे. त्याचप्रमाणे साक्षीदाराने सदरचा मोबाईल फोन साक्षीपुराव्या दरम्यान न्यायालयासमक्ष हजर केला नाही. त्याचप्रमाणे तिने आरोपीला ओळखू शकत नसल्याचे देखील कथन केलेले आहे. बचाब पक्षातर्फे फिर्यादीचा उलटतपास घेण्यात आलेला नाही. परंतु फिर्यादीच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता तिच्या साक्षीपुराव्यावरून असे स्पष्ट होते की, तिने सदर आरोपी विरूध्द कोणतेही आक्षेपार्ह असे कथन केलेले नाही. फिर्यादीच्या म्हणण्याप्रमाणे एका अज्ञात महिलेने तिचा मोबाईल फोन चोरलेला होता. परंतु सदर प्रकरणात आरोपी महिला नसून पुरूष आहे. त्यामुळे फिर्यादीचा साक्षीपुरावा हा निश्चितच आरोपीला दोषी ठरविण्या इतपत पुरेसा ठरणारा नाही.

१०. साक्षीदार क्र ०२ यासीन पठाण पंच साक्षीदार यांच्या साक्षीपुराव्यात असे आले आहे की, दिनांक ०९.०४.२०२३ रोजी ११.२० वाजता निवेदन पंचनाम्याकामी त्यांना वांद्रे रेल्वे पोलीस स्टेशन येथे गुन्हे शाखा युनिट कार्यालयात बोलावले होते. त्या ठिकाणी आरोपी बसला होता. त्यावेळी आरोपीने असे सांगितले की, “पाच मोबाईल फोन

ज्या ठिकाणी ठेवलेले आहेत ते मी दाखवितो."

११. त्यानंतर ते त्या ठिकाणाहून व्ही.टी. येथे गेले. त्यानंतर टॅक्सी पकडून नरिमन पॉईट येथे गेले. त्या ठिकाणी टॅक्सी मधून उतरल्यानंतर आरोपीने एक बिल्डींग दाखवली. त्यानंतर ते बिल्डींगच्या आत मध्ये गेले. त्या ठिकाणी आरोपीने दार ठोकले. त्यावेळी आरोपीच्या पत्नीने दार उघडले. त्यावेळी आरोपीने तिला बॅग देण्यास सांगितले. त्याप्रमाणे तिने बॅग दिली असता, त्यामध्ये पाच मोबाईल फोन मिळून आले. त्यामध्ये एक विवो, एक ओप्पो, एक वन प्लस व दोन सॅमसंग कंपनीचे मोबाईल फोन होते. त्या ठिकाणी पोलिसांनी सदरचे मोबाईल फोन सील केले व ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांची सही घेतली. सदरहू पंचसाक्षीदाराच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी कथन केल्याप्रमाणे ते आरोपीच्या घरी गेले होते. परंतु त्यांचा साक्षीपुरावा हा मोघम स्वरूपाचा वाटण्याचे कारण म्हणजे त्यांच्या साक्षीपुराव्यावरून, ते वांद्रे वरून, आरोपी ज्या ठिकाणी राहत होता, त्या ठिकाणा पर्यतची पुराव्याची साखळी स्पष्ट होत नाही. सदर साक्षीदारा बरोबर इतर कोण कोण होते याबाबत देखील ते काहीही सांगत नाहीत. त्यामुळे त्यांचा साक्षीपुरावा हा निश्चितच आरोपीला दोषी ठरविण्या इतपत पुरेसा ठरणारा नाही.

१२. कृष्णराव चव्हाण साक्षीदार क्रमांक ०३ व मयुर भैय्ये साक्षीदार क्रमांक ०४ यांच्या साक्षीपुराव्यात असे आले आहे की, गु.र.नं. १५३/२०२३ चा समांतर तपास करीत असतांना सदर गुन्हयातील आरोपी सी.एस.एम.टी. रेल्वे स्टेशन येथील धन्यवाद गेट येथे येणार असल्याची बातमी त्यांना मिळाली होती. त्यानंतर त्यांनी सदर ठिकाणी सापळा लावून, सदर आरोपी हा त्या ठिकाणी आला असता त्याला

स्टाफच्या मदतीने ताब्यात घेतले. तो असमाधानकारक व उडवाउडवीची उत्तरे देत असल्यामुळे त्याला चौकशी कामी वांद्रे युनिट कार्यालय येथे घेवून आले. ते पुढे असे सांगतात की, त्यानंतर दोन पंचांना बोलावून त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव इजहार अताउल्ला रेहमान शेख ट्रेस सांगितले. त्याने गु.र.नं. १५३/२०२३ हा गुन्हा केला असल्याचे कबुल केल्यामुळे त्याला सदर गुन्हयामध्ये अटक केली. पोलिस कोठडी दरम्यान त्याने वांद्रे रेल्वे पोलीस स्टेशन गु.र.नं. १५३/२०२३ भा.द.वि. कलम ३७९, चर्चगेट रेल्वे पोलीस स्टेशन गु.र.नं. २७७/२०२२ भा.द.वि. कलम ३७९, चर्चगेट रेल्वे पोलीस स्टेशन गु.र.नं. ०७/२०२३ भा.द.वि. कलम ३७९, चर्चगेट रेल्वे पोलीस स्टेशन गु.र.नं. ५२/२०२३ भा.द.वि. कलम ३७९ आणि मुंबई सेंट्रल रेल्वे पोलिस स्टेशन गु.र.नं. २५२/२०२३ भा.द.वि. कलम ३७९ हे गुन्हे केले असल्याचे कबुल केले. त्याप्रमाणे त्याने सदर पाच गुन्हयातील पाच मोबाईल फोन त्याच्या राहत्या घरातून काढून दिले. त्यानंतर सदरचे मोबाईल फोन पो.हवा. क्षिरसागर यांनी गुन्हयाच्याकामी जप्त केले. त्यामध्ये दोन सॅमसंग कंपनी, एक विवो कंपनीचा, वन प्लस कंपनीचा आणि ओप्पो कंपनीचा मोबाईल फोन होते. त्यांच्या उलटतपासात त्यांचे कथन खंडित होण्या इतपत काहीही आलेले नाही.

१३. तपासिक अंमलदार यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यात साक्षीदार क्र. ०३ व ०४ यांच्या कथनाला अनुरूप असेच कथन केलेले आहे. त्यांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी देखील असे सांगितले आहे की, आरोपीने सांगितल्याप्रमाणे ते आरोपी राहत असलेल्या ठिकाणी गेले होते, परंतु त्यांच्या साक्षीपुराव्यात देखील निसंशय स्पष्टता

दिसून येत नाही. न्यायालयासमक्ष साक्षीपुरावा देताना त्यांनी वांद्रे वरून व्ही.टी. पर्यत ट्रेनने प्रवास केला व त्यानंतर टॅक्सीने नरिमन पॉईट एस. आर.ए. बिल्डींग या ठिकाणी गेले. परंतु ते कोणत्या ट्रेनने गेले होते तसेच ज्या टॅक्सीने गेले होते त्या टॅक्सीचा नंबर देखील कथन केलेला नाही. वर चर्चित केल्याप्रमाणे पंच साक्षीदाराचा साक्षीपुरावा हा विश्वासार्ह ठरत नाही. पंच साक्षीदार असे सांगतात की, आरोपीने सांगितल्यावरून त्याच्या पत्नीने मोबाईल फोन काढून दिले होते. परंतु तपासिक अंमलदार असे सांगतात की, आरोपीने स्वतः त्याच्या खोली मधील कपाट उघडून त्यातील काळया रंगाची सॅकबॅग काढली व त्यानंतर सदर बॅग मधून पाच मोबाईल फोन दोन पंचांसमक्ष हस्तगत केले. त्यामुळे पंच साक्षीदार व तपासिक अंमलदार यांचा साक्षीपुरावा एकमेकांशी सुसंगत असल्याचे दिसून येत नाही.

१४. अभियोगपक्षातर्फे आरोपी विरूध्द भा.द.वि. कलम ३७९ अंतर्गत असलेला दोषारोप संशयाच्या पलीकडे जाऊन सिध्द केलेला नसल्यामुळे आरोपी हा भा.द.वि. कलम ७५ अंतर्गत असलेल्या दोषारोपातून सुध्दा निर्दोष होण्यास पात्र ठरतो. अभियोग पक्षाच्या कथनाबददल एकंदरित संशय निर्माण होतो व संशयाचा फायदा हा नेहमीच आरोपीला देणे अभिप्रेत ठरते. म्हणुन मुददा क्र.१ व २ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतो व मुद्दा क्र.३ ला अनुसरून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१ आरोपी नामे इजहर अताउल्ला रेहमान शेख उर्फ सलमान उर्फ खिडकी, यास भारतीय दंड संहिता कलम ३७९, ७५ अन्वयेच्या गुन्ह्यातून फौजदारी

प्रक्रिया संहितेच्या कलम २४८ (१) नूसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपी इजहर अताउल्ला रेहमान शेख उर्फ सलमान उर्फ खिडकी हा बंदीगृहात बंदी असल्यामूळे, जर त्याची इतर, खटले/प्रकरणांमध्ये आवश्यकता नसेल, तर त्याला त्वरीत मुक्त करावे. सदर आदेशाबाबत या न्यायालयाचे न्यायलिपिक यांनी संबधित कारागृहाचे अधिकारी यांना त्वरीत कळवावे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७ (अ) प्रमाणे रक्कम ₹१५,०००/— (पंधरा हजार) चे वैयक्तिक बंधपत्र दयावेत, ज्याची वैधता अपीलाच्या कालावधीपर्यंत राहिल.

४. जप्त मुददेमाल फिर्यादी यांना परत केला असल्याने त्यांनी सादर केलेला सुपूर्तनामा, आव्हानाचा कालावधी संपल्यानंतर रद्द करण्यात यावा.

५. सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

**सही/—**
(भा. कि. गावंडे)
महानगर दंडाधिकारी,
दि.:— १३/०३/२०२४. ३६वे न्यायालय, मुंबई सेंट्रल, मुंबई.

आलम.

श्रुतलेखन दिनांक. :— १३/०३/२०२४.

प्रतिलेखन दिनांक. :— १३/०३/२०२४.

स्वाक्षरी दिनांक. :— १३/०३/२०२४.

आलम.